# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २003 च्याकलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ११८ / २०२२

वीज जोडणी न मिळाल्यामुळे नुकसान भरपाई मिळण्याबाबत

विलास बाबूराव माने ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, कोल्हापूर ग्रामीण - १ (महावितरण) ............................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- विलास बापूराव माने
रणजीत विलास माने

प्रतिवादीतर्फे :- दिपक शंकरराव पाटील, कार्यकारी अभियंता, कोल्हापूर ग्रामीण १
गणेश पवार, उपकार्यकारी अभियंता, कोल्हापूर ग्रामीण १

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- ६ ऑक्टोंबर २०२२

आदेश पारित दिनांक :- १८ ऑक्टोंबर २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम 2020 (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण,

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक २७ एप्रिल २०२२ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १० ऑगष्ट २०२२ रोजी दाखल केले.

२. मंचाने तक्रारदार यांच गाऱ्हाणे (क्रमांक २०/२०२२), दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीच्या आदेशान्वये अंशतः मान्य करताना खालीलप्रमाणे निर्देश दिलेः

- *वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकाला त्यांने सर्व्हिस कनेक्शन चार्जेस व अनामत रक्कम पोटी जमा केलेली रक्कम रु.६०५०/- तक्रारदार ग्राहकाला परत करावी व सदर रक्कमेवर द.सा.द.शे. ५% दराने सदर रक्कम जमा केलेल्या तारखेपासून ग्राहकाला परत देईपर्यंत व्याज देण्यात यावे.*
- *वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकांला नुकसान भरपाईपोटी तक्रारदार ग्राहकांने सर्व्हीस कनेक्शनच्या भरलेल्या रक्कमेच्या दुप्पट इतकी नुकसान भरपाई म्हणून द्यावी.*
- *तक्रारदार ग्राहकाच्या नवीन सौरपंप कृषी अर्जानुसार विद्युत पंपास विद्युत वितरण कंपनीने शेतीपंपास विद्युत पुरवठा करावा.*

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातोल व दिनाक ६ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरंस द्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी यांनी दिनांक १६ जुलै २०१४ रोजी ५ अश्वशक्तीचे शेती उपयोगासाठी विहीरीवर वीज जोडणी मिळावी म्हणून अर्ज केला. सदर अर्ज दिनांक ५ फेब्रवारी २०१५ रोजी मंजूर झाला. त्यानूसार प्रतिवादीने दिनांक ६ फेब्रुवारी २०१५ रोजी रु.२७५०/- रक्कम भरण्याचे अंदाजपत्रक दिले. त्यानूसार अपिलार्थीने दिनांक २७ मार्च २०१५ रोजी अनामत रक्कमेचा भरणा केला. तसेच ७ जुलै २०२० रोजी सीआरए रक्कम रु.४१३०/- भरण्याचे पत्र आले, त्याचाही भरणा दिनांक १३ जुलै २०२० रोजी केला. दरम्यानच्या कालावधीत अपिलार्थी वीज जोडणी अर्जाचा सतत पाठपूरावा करत होते, तथापि, प्रतिवादीकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत होती.
- नोव्हेबर २०२१ मध्ये केलेल्या चौकशीअंती कनिष्ठ अभियंता, महावितरण निगवे शाखा यांनी अपिलार्थीचे कनेक्शन होऊ शकत नाही तुमचे कनेक्शन दिनांक २५ एप्रिल २०१८ परिपत्रकात

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

निर्देशीत केलेल्या अटीनूसार योजनेत बसत नाही, अपिलार्थींना ते सौर कृषी योजने अंर्तगत योजनेतून घेण्याच्या सुचना केल्या, त्याबाबत त्यांनी दिनांक २२ नोव्हेबर २०२१ रोजीच्या पत्रान्वयेही कळविले.

- अपिलार्थीने नमूद केले की, महावितरणने स्थळ तपासणी दिनांक २८ एप्रिल २०२२ रोजी केली. स्थळ तपासणीच्या वेळेस श्री. हंबीरराव हरी पाटील यांनी त्यांचे खाजगी क्षेत्रात वीज खांब उभारणीसाठी लेखी हरकत घेतल्याचे समजले. त्यामुळे अपिलार्थीच्या वीज जोडणीत अडथळा निर्माण झाला. परंतू सदर लेखी हरकतीबाबत महावितरणकडून कोणतीही माहिती अपिलार्थीस दिली गेली नाही. सदर लेखी हरकतीबाबत, अपिलार्थीस माहिती दिली असती, तर, अपिलार्थीने श्री. महेश यशवंत पाटील यांच्या जमिनीतून वीज खांब उभा करुन वीज जोडणी घेतली असती.
- कोरोनाच्या महामारीच्या कालावधीत वीज देयके थकल्यामुळे अपिलार्थीची घरगुती वोज जोडणी खंडीत केली. थकीत वीज देयकावर भरमसाठ व्याज आकारणी केल्यामुळे ती भरण्यासाठी आर्थिक अडचणी यायच्या. तरीसुध्दा वीज देयक रक्कम भरुन घरगूती वीज जोडणी चालू करुन घेतली.
- अपिलार्थीने दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी अधिक्षक अभियंता, महावितरण कोल्हापूर यांना सन २०१४ पासून नियमानूसार वेळेत वीज जोडणी मिळाली नाही, म्हणून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्‍चितीकरण) विनियम २०१४ (कृती मानके, विनियम २०१४) नुसार नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता, महावितरण कोल्हापूर ग्रामीण १ यांना दिनांक ६ जानेवारी २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले. परंतू त्यावर त्यांच्याकडून काहीही उत्तर आले नाही म्हणून दिनांक ६ मार्च २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली.
- मंचाने सर्व्हिस कनेक्शन चार्जेस व अनामत रक्कम व ५% दराने येणारे व्याज जमा केलेल्या तारखेपासून ग्राहकाला परत देईपर्यंत देण्यात यावे. नुकसान भरपाईपोटी सर्व्हीस कनेक्शनच्या भरलेल्या रक्कमेच्या दुप्पट इतकी नुकसान भरपाई देण्यात यावी. नवीन सौरपंप कृषी अर्जानुसार शेतीपंपास विद्युत पुरवठा करावा असे निर्देश दिले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून, अपिलार्थीने दिनांक १० ऑगष्ट २०२२ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात अभिवेदन दाखल केले.
- अपिलार्थीने कृतीमानके नुसार रू.१००/- प्रती दिवस नुकसान भरपाई मिळावी. मागील ७ ते ८ वर्षात शेतीचे सुमारे रू.१० लाखाचे नुकसान झाले आहे, त्याची नुकसान भरपाई मिळावी. तसेच, अपिलार्थीच्या अर्जाचा सहानभूतीपवंक विचार करून योग्य तो न्याय देण्यात यावा, अश्या मागण्या अपिलार्थीने अभिवेदनात केल्या आहेत.

४. प्रतिवादी महावितरणने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ६ सप्टेंबर २०२२ च्या उत्तरात नमुद केलेले व दिनांक ६ आक्टोबर २०२२ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणेः

- अपिलार्थी यांनी दिनांक १६ जुलै २०१४ रोजी ५ अश्वशक्तीचे शेती उपयोगासाठी विहीरीवर वीज जोडणी मिळावी म्हणून अर्ज केला.
- श्री शिवाजी शामराव पाटील, यांच्या शेतीपंप वीज कनेक्शनला २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात मंजूरी देण्यात आली होती. सदरचे कामासाठी उच्चदाब वाहीनी ०.४८ किमी लघुदाब वाहिणी ०.१२ किमी व १०० केव्हीए रोहीत्र बसविण्यात येणार होते.
- त्यांचे शेतीपंपाचे काम पर्ण होईल असे गृहीत धरून अपिलार्थीचे कनेक्शन (लघुदाब वाहिणी ०.२४ किमी) चे अंदाजपत्रक मंजूरी २०१४-१५ मध्ये देण्यात आली. त्यानूसार प्रतिवादीने अपिलार्थीस दिनांक ६ फेब्रुवारी २०१५ रोजी रू.२७५०/- रक्कम भरण्याचे अंदाजपत्रक दिले. अपिलार्थीने दिनांक २७ मार्च २०१५ रोजी अनामत रक्कमेचा भरणा केला. तसेच ७ जुलै 2020 रोजी सीआरए रक्कम रू.४१30/- भरण्याचे पत्र दिले, त्याचाही भरणा दिनांक १३ जुल 2020 रोजी केला. तथापि, श्री शिवाजी शामराव पाटील यांचे शेतीपंप वीज कनेक्शन त्यांच्या दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या विनंतीनूसार रद्द करण्यात आले.
- दिनांक २५ एप्रिल २०१८ च्या शासन परीपत्रकानूसार मार्च २०१८ पर्वी पैसे भरून प्रलंबित असणारे सर्व शेतीपंप कनेक्शन 'एजी एचव्होडीएस' योजने अंर्तगत समाविष्ठ करण्यात आली होती. तसेच महावितरणचे दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या परीपत्रकानूसार ज्या शेतीपंप कनेक्शनसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.२.५० लाखापेक्षा जास्त (उच्चदाब वाहीणी ६००

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

मीटरपेक्षा जास्त) लागत असल्यास, अशी कनेक्शन सौर कृषीपंप योजनेत देणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

- सदरचे 'एजी एचव्हीडीएस' चे काम करण्यासाठी प्रतिवादी यांच्या कार्यालयाकडून प्रयत्न करण्यात आले. परंतू अपिलार्थीचे वीज जोडणी घेण्याचे ठिकाण हे शहरालगत असल्याने व तेथे बिगरशेती जमीन करण्याचे प्रमाण जास्त असल्याने तेथे वीज वाहीनी उभी करण्याकरीता स्थानिक लोकांचा विरोध होत होता. त्याबाबत श्री. हंबीरराव हरी पाटील यांची हरकत घेतल्याचे नमुद केले. स्थानिक विरोध पाहता श्री. शिवाजी शामराव पाटील यांचा अर्ज रद्द करत असल्याचे त्यांना तोंडी कळविले. त्यामुळे अपिलार्थींच्या जोडणीचे अंतर सध्याच्या उच्चदाब वाहीनी पासून ६०० मीटरच्या वर गेले. वीज जोडणीसाठी अंतर ६०० मीटरच्या वर गेल्याने त्यांना सौर कृषीपंप योजने अंतर्गत वीज जोडणी घेण्याचे महावितरण, कदमवाडी, उपविभागातर्फे दिनांक १९ नोव्हेंबर २०२० च्या लेखी पत्रान्वये कळविण्यात आले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सौर कृषीपंप योजने अंतर्गत वीज कनेक्शन घेण्यास सहमती दर्शवून दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ रोजी शेतीपंप वीज कनेक्शन अर्ज रद्द करणेबाबत व अनामत रक्कम परत मिळणेबाबत शाखा कार्यालय, निगवे, येथे अर्ज सादर केल्यामुळे, सदर अर्ज रद्द करण्यात आला. दरम्यान, श्री. शिवाजी शामराव पाटील यांनी कनेक्शनची आवश्यकता नसल्याने त्यांचा लेखी अर्ज ५ जानेवारी २०२१ रोजी शाखा कार्यालय निगवे यांनी रद्द केला. अपिलार्थी यांची अनामत रक्कम परत मिळावी याकरीता त्यांना आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्याबाबत शाखा कार्यालय निगवे यांनी तोंडी कळविले, शिवाय शाखा कार्यालय निगवे यांनी संबधित कागदपत्रे उपविभाग कदमवाडी या कार्यालयात जमा करण्याबाबत दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी लेखी पत्रान्वये कळविले, तसेच दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ व ४ मार्च २०२२ रोजी ई-मेल मार्फतही कळविले होते.
- अपिलार्थीने दिनांक ९ मे २०२२ रोजी मंचाकडे सौर कृषी योजनेतून वीज कनेक्शन घेण्यास इच्छूक असल्याचे लेखी कळविल्यामुळे तसे वीज कनेक्शन देण्याचे व अनामत रक्कम परत करण्याबाबतचे आदेश दिले. उपविभाग कदमवाडी यांनी अपिलार्थीस दिनांक ३० जून २०२२ च्या पत्रान्वये कागदपत्रे जमा करण्याबाबत कळविले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- मंचाच्या आदेशानूसार भरपाई देण्याबाबत ऑनलाईन अर्ज, बँक पासबूक झेरॉक्स, कॅन्सल चेक व ओळखपत्रे इत्यादी देणे आवश्यक आहे. ती कागदपत्रे जमा करताच नियमानूसार सत्वर तात्काळ कारवाई करण्यात येईल.
- प्रतिवादीने, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे हि विनंती केली.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. मंचाच्या दिनांक २७ एप्रिल २०२२ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थींनी दिनांक १० ऑगष्ट २०२२ रोजी अभिवेदन दाखल केले. ६० दिवसात अभिवेदन दाखल करणे अभिप्रेत असताना, अपिलार्थीने ते दाखल करण्यासाठी १०३ दिवसाचा कालावधी घेतला. तसेच, अभिवेदन दाखल करण्यास उशीर झाल्याचे कोणतेही सबळ कारण दिले नाही. तसेच अभिवेदन दाखल करण्यास झालेल्या उशीराबद्दल क्षमापन करण्याची विनंती नसतानाही अपिलार्थी हे शेतकरी आहेत असे गृहीत धरून अपिलार्थीचे अभिवेदन स्वीकारण्यात येत आहे.

७. अपिलार्थी यांनी दिनांक १६ जुलै २०१४ रोजी शेती उपयोगासाठी विहीरीवर ५ अश्वशक्तीच वीज जोडणी मिळावी म्हणून अर्ज केला. श्री. शिवाजी शामराव पाटील, यांच्या शेतीपंप वीज कनेक्शनला २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात मंजूरी देण्यात आली होती. सदरचे कामासाठी उच्चदाब वाहीनी ०.४८ किमी लघुदाब वाहिणी ०.१२ किमी व १०० केव्हीए रोहीत्र बसविण्यात येणार होते. त्यांचे शेतीपंपाच काम पर्ण होईल असे गृहीत धरून अपिलार्थीचे वीज कनेक्शन (लघुदाब वाहिणी ०.२४ किमी) चे अंदाजपत्रक मंजूरी २०१४-१५ मध्ये देण्यात आली. त्यानूसार अपिलार्थीने दिनांक २७ मार्च २०१५ रोजी रू.२७५०/- रक्कमेचा भरणा केला. तसेच ७ जुलै २०20 रोजी सीआरए रक्कम रू.४१३०/- भरण्याचे पत्र आले त्याचाही भरणा दिनांक १३ जुलै २०20 रोजी केला. तथापि, श्री. शिवाजी शामराव पाटील यांच शेतीपंप वीज कनेक्शन त्यांच्या दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या विनंतीनूसार रद्द करण्यात आले. अपिलार्थीच्या जोडणीचे अंतर सध्याच्या उच्चदाब वाहीनी पासून ६०० मीटरच्या वर गेले. वीज जोडणीसाठीचे अंतर ६०० मीटरच्या वर गेल्याने त्यांना 'सौर कृषीपंप योजन' अंतर्गत वीज जोडणी घेण्याचे महावितरण कदमवाडी उपविभागातर्फे दिनांक १९ नोव्हेंबर २०20 च्या

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

लेखी पत्रान्वये कळविण्यात आले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सौर कृषीपंप योजने अंर्तगत वीज कनेक्शन घेण्यास सहमतीही दर्शवली. तथापि, अपिलार्थीनी विहित नमुन्यात अजुनही सौर कृषीपंप योजनेसाठी लेखी अर्ज केला नाही. सबब, अपिलार्थीचे वीज कनेक्शन प्रलंबीत आहे.

८. मा. आयोग यांच्या दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या केस क्र ६/२०१९ मध्ये शेवटच्या परिच्छेदात सविस्तर आदेश नमुद केला आहे त्यातील महत्वाचा भाग खालील प्रमाणे.

> *"1. …………..*
> *2. …………..*
> *3. The Commission in exercising its power to remove difficulties under these Regulations, provides* ***ceiling of twice the service connection charges*** *on the compensation amount payable. This ceiling is applicable for only Agriculture and residential consumers of notified wadis/vastis.*
> *4. ……………*
> *5. CGRF's and EO's shall consider the revised ceiling while determining the compensation for the pending cases also."* ***(Emphasis added)***

यातील ठळकपणे दर्शविलेल्या मजकूराचा असा स्पष्ट अर्थ होतो की, फक्त "सर्व्हिस कनेक्शन चार्जेसच्या" दुप्पट रक्कमे इतकीच नुकसान भरपाई देणे अभिप्रेत आहे. यात 'सुरक्षा ठेव' किंवा इतर कोणत्याही कारणास्तव भरलेल्या रक्कमेचा समावेश नाही. अपिलार्थीने दिनांक ३० डिसेंबर २०२१ रोजी अधिक्षक अभियंता, महावितरण कोल्हापूर यांना सन २०१४ पासून नियमानूसार वेळेत वीज जोडणी मिळाली नाही म्हणून कृती मानके, विनियम २०१४ नुसार नुकसान भरपाईची मागणी केली आहे. तथापि, मंचाने त्यांच्या आदेशात सर्व्हिस कनेक्शन चार्जेसच्या" दुप्पट रक्कमे इतकीच नुकसान भरपाई दिली आहे.

९. अपिलार्थीने वीजेअभावी शेतीचे नुकसान झाल्याचे नमूद केले आहे. मात्र अप्रत्यक्ष नुकसान भरून देण्याची कोणतीही तरतूद (ग्राहक गाऱ्हाणे विनियम 2020) विनियमात नाही. या संदर्भात विनियम क्र.२०.४ (इ) ची तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

*"२०.४ (इ) ग्राहकाने सहन केलेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीकरीता तो (विद्युत लोकपाल) निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून तक्रारदाराला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा*

*परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामस्वरूप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही; "*

शेतीच्या उत्पन्नाची अप्रत्यक्ष नुकसान भरपाई देण्याची कोणतीही तरतूद विनियमात नाही.

१०. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलिटी) विनियम २०२१, हे दिनांक २५ फेब्रुवारी २०२१ मध्ये प्रकाशित झाले. त्या विनियमानुसार नवीन वीज जोडणीबाबतची ठरविलेली कृती मानके जोडपत्र २ मध्ये उद्धृत केली आहेत.

जोडपत्र - २

*कृतीच्या मानकांची पूर्तता न केल्यामुळे ग्राहकांना द्यावयाची भरपाई*

| पुरवठयाचे कार्य / घटना | | मानक | देय भरपाई | Automatic/Manual |
|---|---|---|---|---|
| १. विद्युत पुरवठा (तात्पूरत्या जोडणीसह) सुरू करणे | | | | |
| (एक) | ...... | ...... | ...... | ...... |
| (दोन) | परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून आणि आकारांचा भरणा केल्यानंतर,पुरवठा करावयाचा कालावधी | | रु.५०/- विलंबाच्या प्रति आठवडयास किंवा त्याच्या भागास, ग्राहक वर्गवारीसाठी लागू असलेल्या सेवा जोडणी | |

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | - अस्तित्वात असलेल्या विद्युत जाळयातून कोणत्याही क्षमता वाढीशिवाय जोडणी द्यावयाची असल्यास | (१) महानगर क्षेत्रातील महापालिका क्षेत्रात - सात (७) दिवस (२) महानगर क्षेत्रातील महापालिका वगळून नागरी क्षेत्रात - पंधरा (१५) दिवस (३) ग्रामीण क्षेत्रात - तीस (३०) दिवस | आकाराच्या जास्तीत जास्त दुपटीच्या अधीन राहून | Automatic |
| | - वितरण मेन्सचा विस्तार किंवा वाढ करावयाची असल्यास | तीन (३) महिने | | Automatic |
| | - वितरण यंत्रणेचा भाग असलेले नवीन उप केंद्र सुरू करावयाची गरज असल्यास | एक (१) वर्ष | | Automatic |

तसेच, या कृतीमानकात खालील प्रमाणे सुट देण्यात आली आहे.

"२६. सुट

२६.१ आयोगाच्या मते, वितरण परवानाधारक जर खालील बाबींमुळे, या विनियमांतील त्याच्यावरील जबाबदाऱ्या पार पाडू शकत नसेल, तर या विनियमातील कोणतीही बाब त्याला लागू होणार नाही -

ए. दैवी आपत्तीच्या घटना जसे की, चक्रीवादळ, पूर, वादळ युध्द, बंड नागरी अशांतता, दंगली, वीज, भुकंप, टाळेबंदी, वीज पुरवठा सावधगिरीने खंडीत करणे, आग ज्यामुळे परवानाधारकाच्या विद्युत संच मांडणीवर किंवा कार्यावर विपरीत परिणाम झाला असेल,

बी. वीज निर्मितीतील बिघाडामुळे किंवा पारेषण जाळयातील बिघाडामुळे जर काम बंद ठेवावे लागले तर;

सी. राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र / पाद्रेशिक भार प्रेषण केंद्र / राज्य भार प्रेषण केंद्राकडुन त्यांच्या सुविधांतील बिघाडामुळे जर आऊटेज करण्यात आले तर;

डी. किंवा वितरण परवानाधारकच्या नियंत्रणाबाहेरील अन्य घटना.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

*परंतू असे की, या विनियमातील कृतीची मानके साध्य करण्यात वितरण परवानाधारकास आलेल्या अपयशाचे कारण जर वितरण प्रणालीच्या प्रतिबंधक देखभालीत कमतरता किंवा निष्काळजीपणा किंवा त्रुटी असेल किंवा वितरण परवानाधारकाने वाजवी सावधगिरी दाखवून योग्य उपाययोजना न करणे हे असेल तर, वितरण परवानाधारकास या अपयशासाठी माफ करता येत नाही."*

११. या गाऱ्हाण्याचा उहापोह करताना असे निदर्शनास येते की, या सर्वांचा एकत्रित विचार करता, अपिलार्थीचा कृती मानकांनुसार भरपाई देण्याचा अर्ज मंचाने योग्यरीत्या निकालात काढलेला आहे. सबब, मंचाच्या आदेशात कोणताही बदल करणे गरजेचे वाटत नाही.

१२. अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत असुन, अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.